दशक सातवा

|| श्रीरामसमर्थ ||

|| श्रीमत् दासबोध ||

| सप्तम दशक ||

समास पहिला : मंगलाचरण

|| श्रीराम ||

विद्यावंतांचा पूर्वजू। गजानन एकद्विजू।

त्रिनयन चतुर्भुजू। परशुपाणि || १||

कुबेरापासून अर्थ। वेदांपासून परमार्थ।

लक्ष्मीपासून समर्थ। भाग्यासी आले || २||

तैशी मंगळमूर्ती आद्या। तियेपासून झाल्या सकळ विद्या।

तेणें कवि लाघवगद्या। सत्पात्रें जाहलीं || ३||

जैशीं समर्थाचीं लेकुरें। नाना अलंकारीं सुंदरें।

मूळपुरुषाचेनि द्वारें। तैसे कवी || ४||

नमूं ऐशिया गणेंद्रा। विद्याप्रकाशपूर्णचंद्रा।

जयाचेनि बोधसमुद्रा । भरतें दाटे बळें ॥ ५॥

जो कर्तृत्वासआरंभ । मूळपुरुष मूळारंभ ।

जो परात्पर स्वयंभ । आदि अंतीं ॥ ६॥

तयापासून प्रमदा । इच्छाकुमारी शारदा ।

आदित्यापासून गोदा । मृगजळ वाहे ॥ ७॥

जे मिथ्या म्हणतांच गोंवी । मायिकपणें लाघवी ।

वक्तयास वेढा लावी । वेगळेपणें ॥ ८॥

जे द्वैताची जननी । कीं ते अद्वैताची खाणी ।

मूळमाया गवसणी । अनंत ब्रह्मांडांची ॥ ९॥

कीं ते अवडंबरी वल्ली । अनंत ब्रह्मांडें लगडली ।

मूळपुरुषाची माउली । दुहितारूपें ॥ १० ।

वंदूं ऐशी वेदमाता । आदिपुरुषाची जे सत्ता ।

आतां आठवीन समर्था । सद्गुरूसी ॥ ११॥

जयाचेनि कृपादृष्टी । होय आनंदाची वृष्टी ।

तेणें गुणें सर्व सृष्टी । आनंदमय ॥ १२॥

कीं तो आनंदाचा जनक । सायुज्यमुक्तीचा नायक ।

कैवल्यपददायक । अनाथबन्धू ॥ १३॥

मुमुक्षचातकीं सुस्वर । करुणां पाहिजे अंबर ।

वोळे कृपेचा जलधर । साधकांवरी ॥ १४॥

कीं तें भवार्णवींचें तारूं । बोधें पाववी पैलपारू ।

महाआवर्ती आधारू । भाविकांसी ॥ १५॥

कीं तो काळाचा नियंता । नाना संकटीं सोडविता ।

कीं ते भाविकाची माता । परम स्नेहाळ ॥ १६॥

कीं तो परत्रींचा आधारू । कीं तो विश्रांतीचा थारू ।

नातरी सुखाचें माहेरू । सुखरूप ॥ १७॥

ऐसा सद्गुरु पूर्णपणीं । तुटे भेदाची कडसणी ।

देहेंविण लोटांगणीं । तया प्रभूसी ॥ १८॥

साधु संत आणि सज्जन । वंदूनियां श्रोतेजन ।

आतां कथानुसंधान । सावध ऐका ॥ १९॥

संसार हाचि दीर्घ स्वप्न । लोभें वोसणती जन ।

माझी कांता माझें धन । कन्या पुत्र माझे ॥ २०॥

ज्ञानसूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला ।

अंधकारें पूर्ण झाला । ब्रह्मगोळ अवघा ॥ २१॥

नाहीं सत्वाचें चांदणें । कांहीं मार्ग दिसे जेणें ।

सर्व भ्रांतीचेनि गुणें । आपेंआप न दिसे ॥ २२॥

देहबुद्धिअहंकारे । निजले घोरती घोरे ।

दुःखें आक्रंदती थोरे । विषयसुखाकारणें॥ २३॥

निजले असतांचि मेले । पुनः उपजतांच निजले ।

ऐसे आले आणि गेले । बहुत लोक ॥ २४॥

निदसुरेपणेंचि सैरावैरा। बहुतीं केल्या येरझारा ।

नेणोनियां परमेश्वरा । भोगिले कष्ट ॥ २५॥

त्या कष्टांचें निरसन । व्हावया पाहिजे आत्मज्ञान ।

म्हणोनि हें निरूपण । अध्यात्मग्रंथीं ॥ २६॥

सकळ विद्यामध्यें सार । अध्यात्मविद्येचा विचार ।

दशमाध्यायीं शाङ्र्गधर । भगवद्गीतेंत बोलिला ॥ २७॥

अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥

याकारणें अद्वैतग्रंथ। अध्यात्मविद्येचा परमार्थ।

पावावया तोचि समर्थ। जो सर्वांगें श्रोता ॥ २८॥

जयाचें चंचळ हृदय। तेणें ग्रंथ सोडूंचि नये।

सोडितां अलभ्य होय। अर्थ येथींचा ॥ २९॥

जयास जोडला परमार्थ। तेणें पहावा हा ग्रंथ।

अर्थ शोधितां परमार्थ। निश्चयो बाणे ॥ ३०॥

जयास नाहीं परमार्थ। तयास न कळे येथींचा अर्थ।

नेत्रेंविण निधानस्वार्थ। अंधास न कळे ॥ ३१॥

एक म्हणती मराठें काये। हें तों भल्यानें ऐकों नये।

तीं मूर्खें नेणती सोयें। अर्थान्वयांची ॥ ३२॥

लोहाची मांदूस केली। नाना रत्नें सांठविलीं।

तीं अभाग्यानें त्यागिलीं। लोखंड म्हणोनि ॥ ३३॥

तैशी भाषा प्राकृत। अर्थ वेदांत आणि सिद्धांत।

नेणोनि त्यागिती भ्रांत। मंदबुद्धीस्तव ॥ ३४॥

अहाच सांपडतां धन । त्याग करणें मूर्खपण।

द्रव्य घ्यावें सांठवण । पाहोंचि नये ॥ ३५॥

परिस देखिला अंगणीं । मार्गी सांपडला चिंतामणी ।

अव्हा वेल महागुणी । कूपामध्यें ॥ ३६॥

तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणि सप्रचीत ।

अध्यात्म लाभे अकस्मात । तरी अवश्य घ्यावें ॥ ३७॥

न करितां व्युत्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होय सुगम ।

सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ॥ ३८॥

जें व्युत्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे ।

सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ॥ ३९॥

म्हणोनि कारण सत्समागम । तेथें नलगे व्युत्पत्तिश्रम।

जन्मसार्थकाचें वर्म । वेगळेंचि असे ॥ ४०॥

भाषाभेदाश्च वर्तन्ते अर्थ एको न संशयः ।

पात्रद्वये यथा खाद्यं स्वादभेदो न विद्यते ॥ १॥

भाषापालटें कांहीं । अर्थ वाया जात नाहीं ।

कार्यसिद्धि ते सर्वही । अर्थाचपासीं ॥ ४१॥

तथापि प्राकृताकरितां । संस्कृताची सार्थकता ।

ये-हव्हीं त्या गुप्तार्था । कोण जाणे ॥ ४२॥

आतां असो हें बोलणें । भाषा त्यागून अर्थ घेणें ।

उत्तम घेऊन त्याग करणें । सालीटरफलांचा ॥ ४३॥

अर्थ सार भाषा पोंचट । अभिमानें करवी खटपट ।

नाना अहंतेनें वाट । रोधिली मोक्षाची ॥ ४४॥

शोध घेतां लक्ष्यांशाचा । तेथें आधीं वाच्यांश कैंचा ।

अगाध महिमा भगवंताचा । कळला पाहिजे ॥ ४५॥

मुकेपणाचें बोलणें । हें जयाचें तोचि जाणें ।

स्वानुभवाचिये खुणें । स्वानुभवी पाहिजे ॥ ४६॥

अर्थ जाणे अध्यात्माचा । ऐसा श्रोता मिळेल कैंचा ।

जयासि बोलतां वाचेचा । हव्यासचि पुरे ॥ ४७॥

परीक्षावंतापुढें रत्न । ठेवितां होय समाधान ।

तैसें ज्ञानियापुढें ज्ञान । बोलावें वाटे ॥ ४८॥

मायाजाळें दुश्चित होय। तें निरूपणें कामा नये।

संसारिका कळे काय। अर्थ येथींचा ॥ ४९॥

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन।

बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयो। अव्यवसायिनाम् ॥ १॥

व्यवसायी जो मळिण। त्यासि न कळे निरूपण।

येथें पाहिजे सावधपण। अतिशयेंसीं ॥ ५०॥

नाना रत्नें नाना नाणीं। दुश्चितपणें घेतां हानी।

परीक्षा नेणतां प्राणी। ठकला तेथें ॥ ५१॥

तैसें निरूपणीं जाणा। आहाच पाहतां कळेना।

मराठेंचि उमजेना। कांहीं केल्या ॥ ५२॥

जेथें निरूपणाचे बोल। आणि अनुभवाची ओल।

ते संस्कृतापरी सखोल। अध्यात्मश्रवण ॥ ५३॥

माया ब्रह्म वोळखावें। तयास अध्यात्म म्हणावें।

तरी तें मायेचें जाणावें। स्वरूप आधीं ॥ ५४॥

माया सगुण साकार। माया सर्व विकार।

माया जाणिजे विस्तार । पंचभूतांचा ॥ ५५॥

माया दृश्य दृष्टीस दिसे । मायाभास मनास भासे ।

माया क्षणभंगुर नासे । विवेकें पाहतां ॥ ५६॥

माया अनेक विश्वरूप । माया विष्णूचें स्वरूप ।

मायेची सीमा अमूप । बोलिजे तितुकी थोडी ॥ ५७॥

माया बहुरूप बहुरंग । माया ईश्वराचा संग ।

माया पाहतां अभंग । अखिल वाटे ॥ ५८॥

माया सृ ष्टीचीरचना । माया आपली कल्पना ।

माया तोडितां तुटेना । ज्ञानेंविण ॥ ५९॥

ऐशी माया निरूपिली । स्वल्प संकेतें बोलिली ।

पुढें वृ त्तिसावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ६०॥

पुढें ब्रह्मनिरूपण । निरूपिलें ब्रह्मज्ञान ।

जेणें तुटे मायाभान । एकसरें ॥ ६१॥

हरिः ॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके मंगलाचरणनिरूपणं नाम प्रथमः समासः ॥ १॥

---------------------------------------------------------------

जय जय रघुवीर समर्थ ||

समास दुसरा : ब्रह्मनिरूपण

श्रीराम ||

ब्रह्म निर्गुण निराकार | ब्रह्म निःसंग निराकार |

ब्रह्मास नाहीं पारावार | बोलती साधू || १||

ब्रह्म सर्वांस व्यापक | ब्रह्म अनेकीं एक |

ब्रह्म शाश्वत हा विवेक | बोलिला शास्त्रीं || २||

ब्रह्म अच्युत अनंत | ब्रह्म सदोदित संत |

ब्रह्म कल्पनेरहित | निर्विकल्प || ३||

ब्रह्म दृश्यावेगळें | ब्रह्म शून्यत्वानिराळें |

ब्रह्म इन्द्रियांच्या मेळें | चोजवेना || ४||

ब्रह्म दृष्टीस दिसेना | ब्रह्म मूर्खास असेना |

ब्रह्म सद्गुरुविण येइना | अनुभवासी || ५||

ब्रह्म सकळांहूनि थोर | ब्रह्मा ऐसें नाहीं सार |

ब्रह्म सूक्ष्म अगोचर। ब्रह्मादिकांसी ॥ ६॥

ब्रह्म शब्दीं ऐसें तैसें। बोलिजे त्याहूनि अनारिसें।

परी तें श्रवणअभ्यासें। पाविजे ब्रह्म ॥ ७॥

ब्रह्मास नामें अनंत। परी तें ब्रह्म नामातीत।

ब्रह्मास हे दृष्टांत। देतां न शोभती ॥ ८॥

ब्रह्मासारिखें दुसरें। पाहतां काय आहे खरें।

ब्रह्मीं दृष्टांतउत्तरें। कदा न साहती ॥ ९॥

यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह ॥

जेथें वाचा निवर्तती। मनास नाहीं ब्रह्मप्राप्ती।

ऐसें बोलिती श्रुती। सिद्धांतवचन ॥ १०॥

कल्पनारूप मन पाहीं। ब्रह्मीं कल्पनाचि नाहीं।

म्हणोनि हें वाक्य कांहीं। अन्यथा नव्हे ॥ ११॥

आतां मनासि जें अप्राप्त। तें कैसेनि होईल प्राप्त।

ऐसें म्हणाल तरी कृत्य। सद्गुरुविण नाहीं ॥ १२॥

भांडारगृ हेंभरलीं। परी असती आडकलीं।

हातास न येतां किल्ली । सर्वही अप्राप्त ॥ १३॥

तरी ते किल्ली कवण । मज करावी निरूपण ।

ऐसी श्रोता पुसे खूण। वक्तयासी ॥ १४॥

सद्गुरुकृपा तेचि किल्ली । जेणें बुद्धी प्रकाशली ।

द्वैतकपाटें उघडलीं । एकसरां ॥ १५॥

तेथें सुख असे वाड । नाहीं मनासी पवाड ।

मनेंविण कैवाड । साधनांचा ॥ १६॥

त्याची मनाविण प्राप्ती । कीं वासनेविण तृप्ती।

तेथें न चले व्युत्पत्ती। कल्पनेची ॥ १७॥

तें परेहुनी पर । मनबुद्धिअगोचर ।

संग सोडितां सत्वर । पाविजे तें ॥ १८॥

संग सोडावा आपुला । मग पहावें तयाला ।

अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ॥ १९॥

आपण म्हणजे मीपण । मीपण म्हणजे जीवपण ।

जीवपण म्हणजे अज्ञान । संग जडला ॥ २०॥

सोडितां तया संगासी । ऐक्य होय निःसंगासी ।

कल्पनेविण प्राप्तीसी । अधिकार ऐसा ॥ २१॥

मी कोण ऐसें नेणिजे । तया नांव अज्ञान बोलिजे ।

अज्ञान गेलिया पाविजे । परब्रह्म तें ॥ २२॥

देहबुद्धीचें थोरपण । परब्रह्मीं न चले जाण ।

तेथें होतसे निर्वाण । अहंभावासी ॥ २३॥

ऊंच नीच नाहीं परी । रायारंका एकच सरी ।

झाला पुरुष अथवा नारी । तरी एकचि पद ॥ २४॥

ब्राह्मणांचें ब्रह्म तें सोंवळें । शूद्राचें ब्रह्म तें ओं वळें।

ऐसें वेगळें आगळें । तेथें असेचिना ॥ २५॥

ऊंच ब्रह्म तें रायासी । नीच ब्रह्म तें परिवारासी ।

ऐसा भेद तयापाशीं । मुळींच नाहीं ॥ २६॥

सकळांस मिळोन ब्रह्म एक । तेथें नाहीं अनेक ।

रंक अथवा ब्रह्मादिक । तेथेंचि जाती ॥ २७॥

स्वर्ग मृत्यु आणि पाताळ । तिहीं लोकींचे ज्ञाते सकळ ।

सकळांसि मिळोनि एकचि स्थळ । विश्रांतीचें ॥ २८॥

गुरुशिष्यां एकचि पद । तेथें नाहीं भेदाभेद ।

परी या देहाचा संबंध । तोडिला पाहिजे ॥ २९॥

देहबुद्धीच्या अंतीं । सकळांसि एकचि प्राप्ती ।

एकं ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतीचें वचन ॥ ३०॥

साधु दिसती वेगळाले । परी ते स्वस्वरूपीं मिळाले ।

अवघे मिळोनि एकचि झाले । देहातीत वस्तु ॥ ३१ ।

ब्रह्म नाहीं नवें जुनें । ब्रह्म नाहीं अधिक उणें ।

उणें भावील तें सुणें । देहबुद्धीचें ॥ ३२॥

देहबुद्धीचा संशयो । करी समाधानाचा क्षयो ।

चुके समाधानसमयो । देहबुद्धियोगें ॥ ३३॥

देहाचें जें थोरपण । तेंचि देहबुद्धीचें लक्षण ।

मिथ्या जाणोन विचक्षण । निंदिती देह ॥ ३४॥

देह पावे जंवरी मरण । तंवरी धरी देहाभिमान ।

पुन्हा दाखवी पुनरागमन । देहबुद्धि मागुती ॥ ३५॥

देहाचेनि थोरपणें। समाधानासि आणिलें उणें।

देह पडेल कोण्या गुणें। हेंही कळेना ॥ ३६॥

हित आहे देहातीत। म्हणोनि निरूपिती संत।

देहबु्द्धीनें अनहित। हो)ऊंचि लागे ॥ ३७॥

सामर्थ्यबळें देहबुद्धि। योगियांस तेही बाधी।

देहबु्द्धीची उपाधी। पैसावों लागे ॥ ३८॥

म्हणोनि देहबुद्धि झडे। तरीच परमार्थ घडे।

देहबु्द्धीनें बिघडे। ऐक्यता ब्रह्मींची ॥ ३९॥

विवेक वस्तूकडे ओढी। देहबुद्धि तेथूनि पाडी।

अहंता लावूनि निवडी। वेगळेपणें ॥ ४०॥

विचक्षणें याकारणें। देहबुद्धि त्यजावी श्रवणें।

सत्य ब्रह्मीं साचारपणें। मिळोन जावें ॥ ४१॥

सत्य ब्रह्म तें कवण। ऐसा श्रोता करी प्रश्न।

प्रत्युत्तर दे आपण। वक्ता श्रोतयासी ॥ ४२॥

म्हणे ब्रह्म एकचि असे। परी तें बहुविध भासे।

अनुभव देहीं अनारिसे। नाना मतीं ॥ ४३॥

जें जें जया अनुभवलें। तेंचि तयासी मानलें।

तेथेंचि त्याचें विश्वासलें। अंतःकरण ॥ ४४॥

ब्रह्म नामरूपातीत। असोनि नामें बहुत।

निर्मळ निश्चळ निवांत। निजानन्द ॥ ४५॥

अरूप अलक्ष अगोचर। अच्युत अनंत अपरंपार।

अदृश्य अतर्क्य अपार। ऐशीं नामें ॥ ४६॥

नादरूप ज्योतिरूप। चैतन्यरूप सत्तारूप।

स्वस्वरूप साक्षरूप। ऐशीं नामें ॥ ४७॥

शून्य आणि सनातन। सर्वेश्वर आणि सर्वज्ञ।

सर्वात्मा जगज्जीवन। ऐशीं नामें ॥ ४८॥

सहज आणि सदोदित। शुद्ध बुद्ध सर्वातीत।

शाश्वत आणि शब्दातीत। ऐशीं नामें ॥ ४९॥

विशाळ विस्तीर्ण विश्वंभर। विमळ वस्तु व्योमाकार।

आत्मा परमात्मा परमेश्वर। ऐशीं नामें ॥ ५०॥

परमात्मा ज्ञानघन। एकरूप पुरातन।

चिद्रूप चिन्मात्र जाण। नामें अनाम्याचीं॥ ५१॥

ऐशीं नामें असंख्यात। परी तो परेश नामातीत।

त्याचा करावया निश्चितार्थ। ठेविलीं नामें॥ ५२॥

तो विश्रांतीचा विश्राम। आदिपुरुष आत्माराम।

तें एकचि परब्रह्म। दुसरें नाहीं॥ ५३॥

तेंचि कळावयाकारणें। चौदा ब्रह्मांचीं लक्षणें।

सांगिजेती तेणें श्रवणें। निश्चयो बाणे॥ ५४॥

खोटें निवडितां एकसरें। उरलें तें जाणिजे खरें।

चौदा ब्रह्में शास्त्राधारें। बोलिजेती॥ ५५॥

हरि ॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके ब्रह्मनिरूपणं नाम द्वितीयः समासः॥ २॥

---------------------------------------------------------------

समास तीसरा : चतुर्दशब्रह्मनिरूपण

श्रीराम॥

श्रोतां व्हावें सावधान। आतां सांगतों ब्रह्मज्ञान।

जेणें होये समाधान। साधकांचें॥ १॥

रत्नें साधाया कारणें। मृत्तिका लागे एकवटणें।

चौदा ब्रह्मांचीं लक्षणें। जाणिजे तैसीं॥ २॥

पदार्थेंविण संकेत। द्वैतावेगळा दृष्टांत।

पूर्वपक्षेंविण सिद्धांत। बोलतांचि नये॥ ३॥

आधीं मिथ्या उभारावें। मग तें ओळखोन सांडावें।

पुढें सत्य तें स्वभावें। अंतरीं बाणे॥ ४॥

म्हणोन चौदा ब्रह्मांचा संकेत। बोलिला कळावया सिद्धांत।

येथें श्रोतीं सावचित्त। क्षण एक असावें॥ ५॥

पहिलें तें शब्दब्रह्म। दुजें ओमित्येकाक्षरं ब्रह्म।

तिसरें खंब्रह्म। बोलिली श्रुती॥ ६॥

चौथें जाण सर्वब्रह्म। पांचवें चैतन्यब्रह्म।

सहावें सत्ताब्रह्म। साक्षिब्रह्म सातवें॥ ७॥

आठवें सगुणब्रह्म। नववें निर्गुण ब्रह्म।

दहावें वाच्यब्रह्म । जाणावें पैं ॥ ८॥

अनुभव तें अकरावें । आनंदब्रह्म तें बारावें ।

तदाकार तें तेरावें । चौदावें अनिर्वाच्य ॥ ९॥

ऐशीं हीं चौदा ब्रह्मे । यांचीं निरूपिलीं नामें ।

आतां स्वरूपांचीं वर्मैं । संकेतें दावूं ॥ १०॥

अनुभवेंविण भ्रम । या नां शब्दब्रह्म ।

आतां ओमित्येकाक्षरं ब्रह्म । तें एकाक्षर ॥ ११॥

खं शब्दें आकाशब्रह्म । महदाकाश व्यापक ब्रह्म ।

आतां बोलिजेल सूक्ष्म ब्रह्म । सर्वब्रह्म ॥ १२॥

पंचभूतांचें कुवाडें । जें जें तत्त्व दृष्टीस पडे ।

तें तें ब्रह्मचि रोकडें । बोलिजेत आहे ॥ १३॥

या नांव सर्वब्रह्म । श्रुतिआश्रयाचें वर्म ।

आतां चैतन्यब्रह्म । बोलिजेल ॥ १४॥

पंचभूतादि मायेतें । चैतन्यचि चेतवितें ।

म्हणोनियां चैतन्यातें । चैतन्यब्रह्म बोलिजे ॥ १६॥

चैतन्यास ज्याची सत्ता । तें सत्ताब्रह्म तत्त्वतां ।

तये सत्तेस जाणता । या नांव साक्षिब्रह्म ॥ १७॥

साक्षित्व जयापासूनी । तेंहीं आकळिलें गुणीं ।

सगुणब्रह्म हे वाणी । तयासि वदे ॥ १८॥

जेथें नाहीं गुणवार्ता । तें निर्गुणब्रह्म तत्त्वतां ।

वाच्यब्रह्म तेंही आतां । बोलिजेल ॥ १९॥

या नांव अनुभवब्रह्म । आनंदवृत्तीचा धर्म ।

परंतु याचेंही वर्म । बोलवेना ॥ २०॥

ऐसें हें ब्रह्म आनंद । तदाकार तें अभेद ।

अनिर्वाच्य संवाद । तुटोनि गेला ॥ २१॥

ऐशीं हीं चौदा ब्रह्में । निरूपिलीं अनुक्रमें ।

साधकें पाहतां भ्रमें । बाधिजेना ॥ २२॥

ब्रह्म जाणावें शाश्वत । माया तेचि अशाश्वत ।

चौदा ब्रह्मांचा सिद्धांत । होईल आतां ॥ २३॥

शब्दब्रह्म तें शाब्दिक । अनुभवेंविण मायिक ।

शाश्वताचा विवेक। तेथें नाहीं ॥ २४॥

जेथें क्षर ना अक्षर। तेथें कैंचें ओमित्येकाक्षर।

शाश्वताचा विचार। तेथें न दिसे ॥ २५॥

खंब्रह्म ऐसें वचन। तरी शून्यातें नाशी ज्ञान।

शाश्वताचें अधिष्ठान। तेथें न दिसे ॥ २६॥

सर्वत्रांस होतो अंत। हें तों प्रगटचि दिसत।

प्रळय बोलिला निश्चित। वेदांतशास्त्रीं ॥ २७॥

ब्रह्मप्रळय मांडेल जेथें। भूतान्वय कैंचा तेथें।

म्हणोनिअ सर्वब्रह्मातें। नाश आहे ॥ २८॥

अचळासी आणी चळण। निर्गुणास लावितां गुण।

आकारास विचक्षण। मानीतना ॥ २९॥

जें निर्माण पंचभूत। तें प्रत्यक्ष नाशवंत।

सर्वब्रह्म हे मात। घडे केंवीं ॥ ३०॥

असो आतां हें बहुत। सर्वब्रह्म नाशवंत।

वेगळेपणास अंत। पाहणें कैंचें ॥ ३१॥

आतां जयास चेतवावें । तेंचि मायिक स्वभावें ।

तेथें चैतन्याच्या नांवें । नाश आला ॥ ३२॥

परिवारेंविण सत्ता । ते सत्ता नव्हे तत्त्वतां ।

पदार्थेंविण साक्षता । तेही मिथ्या ॥ ३३॥

सगुणास नाश आहे । प्रत्यक्षास प्रमाण काये ।

सगुणब्रह्म निश्चयें । नाशवंत ॥ ३४॥

निर्गुण ऐसें जें नांव । त्या नांवास कैंचा ठाव ।

गुणेंवीण गौरव । येईल कैंचें ॥ ३५॥

माया जैसें मृगजळ। ऐसें बोलती सकळ ।

कां तें कल्पनेचें आभाळ । नाथिलेंचि ॥ ३६॥

ग्रामो नास्ति कुतः सीमा । जन्मेंविण जीवात्मा ।

अद्वैतासी उपमा । द्वैताची असे ॥ ३७॥

मायेविरहित सत्ता । पदार्थाविण जाणता ।

अविद्येविण चैतन्यता। कोणास आली ॥ ३८॥

सत्ता चैतन्यता साक्षी । सर्वही गुणांचिये पाशीं ।

ठायींचें निर्गुण त्यासीं । गुण कैंचें ॥ ३९॥

ऐसें जें गुणरहित । तेथें नामाचा संकेत ।

तोचि जाणावा अशाश्वत । निश्चयेंसीं ॥ ४०॥

निर्गुण ब्रह्मासी संकेतें । नामें ठेविलीं बहुतें ।

तें वाच्यब्रह्म त्यातें । नाश आहे ॥ ४१॥

आनंदाचा अनुभव । हाही वृत्तीचाच भाव ।

तदाकारीं ठाव । वृत्तीस नाहीं ॥ ४२॥

अनिर्वाच्य याकारणें । संकेत वृत्तीच्या गुणें ।

तया संकेतास उणें । निवृत्तीनें आणिलें ॥ ४३॥

अनिर्वाच्य ते निवृत्ती। तेचि उन्मनीची स्थिती ।

निरुपाधि विश्रांती । योगियांची ॥ ४४॥

वस्तु जे कां निरुपाधी । तेचि सहज समाधी ।

जेणें तुटे आधिव्याधी । भवदु:खाची ॥ ४५॥

जो उपाधीचा अंत । तोचि जाणावा सिद्धांत ।

सिद्धांत आणि वेदांत । धादांत आत्मा ॥ ४६॥

असो ऐसें जें शाश्वत ब्रह्म । जेथें नाहीं मायाभ्रम ।

अनुभवी जाणे वर्म । स्वानुभवें ॥ ४७॥

आपुलेनि अनुभवें । कल्पनेसि मोडावें ।

मग सुकाळीं पडावें । अनुभवाचे ॥ ४८॥

निर्विकल्पासि कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें ।

मग नसोनि असावें । कल्पकोटी ॥ ४९॥

कल्पनेचें एक बरें । मोहरितांच मोहरे ।

स्वरूपीं घालितां भरे । निर्विकल्पीं ॥ ५०॥

निर्विकल्पास कल्पितां । कल्पनेचि नुरे वार्ता ।

निःसंगास भेटों जातां । निःसंग होइजे ॥ ५१॥

पदार्था ऐसें ब्रह्म नव्हे । मा तें हातीं धरूनि द्यावें ।

असो हें अनुभवावें । सद्गुरुमुखें॥ ५२॥

पुढें कथेच्या अन्वयें । केलाचि करूं निश्चये ।

जेणें अनुभवास ये । केवळ ब्रह्म ॥ ५३॥

हरि ॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके चतुर्दशब्रह्मनिरूपणं नाम तृतीयःसमासः ॥ ३॥

----------------------------------------------------------------

समास चवथा : विमलब्रह्मनिरूपण

श्रीराम ॥

ब्रह्म नभाहूनि निर्मळ । पाहतां तैसेंचि पोकळ ।

अरूप आणि विशाळ । मर्यादेवेगळें ॥ १॥

एकवीस स्वर्गें सप्त पाताळ । मिळोन एक ब्रह्मगोळ ।

ऐसें अनंत तें निर्मळ । व्यापून असे ॥ २॥

अनंत ब्रह्मांडांखालतें । अनंत ब्रह्मांडांवरुतें ।

तेणेंविण स्थळ रितें । अणुमात्र नाहीं ॥ ३॥

जळीं स्थळीं काष्ठीं पाषाणीं । ऐशी वदे लोकवाणी ।

तेणेंविण रिता प्राणी । एकही नाहीं ॥ ४॥

जळचरां जैसें जळ । बाह्य अभ्यंतरीं निखळ ।

तैसें ब्रह्म हें केवळ । जीवमात्रासी ॥ ५॥

जळावेगळा ठाव आहे । ब्रह्माबाहेरी जातां न ये ।

म्हणोनि उपमा न साहे। जळाची तया॥ ६॥

आकाशाबाहेरी पळों जातां। पुढें आकाशचि तत्त्वतां।

तैसा तया अनंता। अंतचि नाहीं॥ ७॥

परी जें अखंड भेटलें। सर्वांगास लिगडिलें।

अति निकट परी चोरलें। सकळांसि जें॥ ८॥

तयामध्येंचि असिजे। परी तयासी नेणिजे।

उपजे भास नुपजे। परब्रह्म तें॥ ९॥

आकाशामध्यें आभाळ। तेणें आकाश वाटे डहुळ।

परी तें मिथ्या निवळ। आकाशचि असे॥ १०॥

नेहार देतां आकाशीं। चक्रें दिसती डोळ्यांसी।

तैसें दृश्य ज्ञानियांसी। मिथ्यारूप॥ ११॥

मिथ्याचि परी आभासे। निद्रितांसी स्वप्न जैसें।

जागा झालिया आपैसें। बुझों लागे॥ १२॥

तैसें आपुलेनि अनुभवें। ज्ञानें जागृ तीसयावें।

मग मायिक स्वभावें। कळों लागे॥ १३॥

आतां असो हें कुवाडें । जें ब्रह्मांडापैलीकडे ।

तेंचि आतां निवाडें । उमजोन दावूं ॥ १४॥

ब्रह्म ब्रह्मांडीं कालवलें । पदार्थमात्रासि व्यापून ठेलें ।

सर्वांमध्यें विस्तारलें । अंशमात्रें ॥ १५॥

ब्रह्मामध्यें सृष्टीभासे । सृष्टीमध्येंब्रह्म असे ।

अनुभव घेतां आभासे । अंशमात्रें ॥ १६॥

अंशमात्रें सृष्टीभीतरीं। बाहेरी मर्यादा कोण करी ।

सगळें ब्रह्म ब्रह्मांडोदरीं । माईल कैसें ॥ १७॥

अमृतीमध्येंआकाश । सगळें सांठवतां प्रयास ।

म्हणोन तयाचा अंश । बोलिजे तो ॥ १८॥

ब्रह्म तैसें कालवलें । परी तें नाहीं हालवलें ।

सर्वांत परी संचलें । संचलेपणें ॥ १९॥

पंचभूतीं असे मिश्रित । परंतु तें पंचभूतातीत।

पंकीं आकाशीं अलिप्त । असोनि जैसें॥ २०॥

ब्रह्मास दृष्टांत न घडे । बुझावया देणें घडे ।

परी दृष्टांतीं साहित्य पडे । विचारितां आकाश ॥ २१॥

खंब्रह्म ऐशी श्रुती । गगनसदृशं हे स्मृ ती।

म्हणोन ब्रह्मास दृष्टांतीं । आकाश घडे ॥ २२॥

काळिमा नसतां पितळ । मग तें सोनेंचि केवळ ।

शून्यत्व नसतां निर्मळ । आकाश ब्रह्म ॥ २३॥

म्हणोन ब्रह्म जैसें गगन । आणि माया जैसा पवन ।

आढळे परी दर्शन । नव्हे त्याचें ॥ २४॥

शब्दसृ ष्टीचीरचना । होत जात क्षणक्षणां ।

परंतु ते स्थिरावेना । वायूचऐसी ॥ २५॥

असो ऐशी माया मायिक । शाश्वत तें ब्रह्म एक ।

पाहों जातां अनेक । व्यापून असे ॥ २६॥

पृ थ्वीसिभेदूनि आहे । परी तें ब्रह्म कठिण नव्हे ।

दुजी उपमा न साहे । तया मृ दुत्वासी॥ २७॥

पृ थ्वीहूनिमृ दु जळ । जळाहूनि तो अनळ ।

अनळाहूनि कोमळ । वायु जाणावा ॥ २८॥

वायूहूनि तें गगन । अत्यंतचि मृदु जाण ।

गगनाहूनि मृदु पूर्ण । ब्रह्म जाणावें ॥ २९॥

वज्रास असे भेदिलें । परी मृदुत्व नाहीं गेलें ।

उपमेरहित संचलें । कठिण ना मृदु॥ ३०॥

पृथ्वीमध्यें व्यापूनि असे । पृथ्वी नासे तें न नासे ।

जळ शोषे तें न शोषे । जळीं असोनी ॥ ३१॥

तेजीं असे परी जळेना । पवनीं असे तरी चळेना ।

गगनीं असे परी कळेना । परब्रह्म तें ॥ ३२॥

शरीरीं अवघें व्यापलें । परी तें नाहीं आढळलें ।

जवळीच दुरावलें। नवल कैसें ॥ ३३॥

सन्मुखचि चहूंकडे । तयामध्यें पाहणें घडे ।

बाह्याभ्यंतरीं रोकडें । सिद्धचि आहे ॥ ३४॥

तयांमध्येंचि आपण । आपणां सबाह्य तें जाण ।

दृश्या वेगळी खूण । गगनासारिखी ॥ ३५॥

कांहीं नाहींसें वाटलें । तेथेंचि तें कोंदाटलें ।

जैसें न दिसें आपुलें। आपणासि धन ॥ ३६॥

जो जो पदार्थ दृष्टीस पडे। तें त्या पदार्था पैलीकडे।

अनुभवे हें कुवाडें। उकलावें ॥ ३७॥

मागें पुढें आकाश। पदार्थेंविण जो पैस।

पृथ्वीविणभकाश। एकरूप ॥ ३८॥

जें जें रूप आणि नाम। तो तो नाथिलाचि भ्रम।

नामरूपातीत वर्म। अनुभवी जाणती ॥ ३९॥

नभीं धूम्राचे डोंगर। उचलती थोर थोर।

तैसें दावी वोडंबर। मायादेवी ॥ ४०॥

ऐशी माया अशाश्वत। ब्रह्म जाणावें शाश्वत।

सर्वांठायीं सदोदित। भरलें असे ॥ ४१॥

पोथी वाचूं जातां पाहे। मातृकामध्यें भरलें आहे।

नेत्रीं रिघोनियां राहे। मृदुपणें॥ ४२॥

श्रवणें शब्द ऐकतां। मनें विचार पाहतां।

मना सबाह्य तत्त्वतां। परब्रह्म तें ॥ ४३॥

चरणीं चालतां मार्गीं । जें आडळे सर्वांगीं ।

करें घेतां वस्तुलागीं । आडवें ब्रह्म ॥ ४४॥

असो इंद्रियसमुदाव । तयामध्यें वर्ते सर्व ।

जाणों जातां मोडे हांव । इंद्रियांची ॥ ४५॥

जें जवळीच असे । पांहों जातां न दिसे ।

न दिसोन वसे । कांहीं एक ॥ ४६॥

जें अनुभवेंचि जाणावें । सृ ष्टीचेनिअभावें ।

आपुलेनि स्वानुभवें । पाविजे ब्रह्म ॥ ४७॥

ज्ञानदृष्टीचें देखणें । चर्मदृष्टी पाहों नेणे ।

अंतरवृ त्तीचियेखुणे । अंतरवृ त्तिसाक्ष ॥ ४८॥

जाणे ब्रह्म जाणे माया । जाणे अनुभवाच्या ठाया ।

ते येक जाणावी तुर्या । सर्वसाक्षिणी ॥ ४९॥

साक्षत्व वृ त्तीचेंकारण । उन्मनी ते निवृ त्तिजाण ।

जेथें विरे जाणपण । विज्ञान तें ॥ ५०॥

जेथें अज्ञान सरे । ज्ञान तेंही नुरे ।

विज्ञानवृत्तिमुरे। परब्रह्मीं॥ ५१॥

ऐसें ब्रह्म शाश्वत। जेथें कल्पनेसी अंत।

योगिजना एकांत। अनुभवें जाणावा॥ ५२॥

हरि ॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके विमलब्रह्मनिरूपणं नाम चतुर्थः समासः॥ ४॥

-----------------------------------------------------------------

समास पांचवा : द्वैतकल्पनानिरसन

श्रीराम॥

केवळब्रह्म जें बोलिलें। तें अनुभवास आलें।

आणि मायेचेंहि लागलें। अनुसंधान॥ १॥

ब्रह्म अंतरीं प्रकाशे। आणि मायाही प्रत्यक्ष दिसे।

आतां हें द्वैत निरसे। कवणेपरी॥ २॥

तरी आतां सावधान। एकाग्र करूनियां मन।

मायाब्रह्म हें कवण। जाणताहे॥ ३॥

सत्य ब्रह्माचा संकल्प। मिथ्या मायेचा विकल्प।

ऐशिया द्वैताचा जल्प । मनचि करी ॥ ४॥

जाणे ब्रह्म जाणे माया । ते येक जाणावी तुर्या ।

सर्व जाणे म्हणोनियां । सर्वसाक्षिणी ॥ ५॥

ऐक तुर्येचें लक्षण । जेथें सर्व जाणपण ।

सर्वचि नाहीं कवण । जाणेल गा ॥ ६॥

संकल्पविकल्पाची सृष्टी। जाली मनाचियें पोटीं ।

तें मनचि मिथ्या शेवटीं । साक्षी कवणु ॥ ७॥

साक्षत्व चैतन्यत्वसत्ता। हे गुण ब्रह्माचिया माथां ।

आरोपले जाण वृथा। मायागुणें॥ ८॥

घटामठाचेनि गुणें । त्रिविधा आकाश हें बोलणें ।

मायेचेनि खरेंपणें । गुण ब्रह्मीं ॥ ९॥

जंव खरेपण मायेसी । तंवचि साक्षित्व ब्रह्मासी ।

मायेअविद्येचे निरासीं । द्वैत कैंचें ॥ १०॥

म्हणोनि सर्वसाक्षी मन । तेंचि जालिया उन्मन ।

मग तुर्यारूप ज्ञान । तें मावळोन गेलें ॥ ११॥

जयास द्वैत भासलें । तें मन उन्मन झालें ।

द्वैताअद्वैतांचें तुटलें । अनुसंधान ॥ १२॥

एवं द्वैत आणि अद्वैत । होये वृत्तीचासंकेत ।

वृत्तिझालिया निर्वृत्त। द्वैत कैंचें ॥ १३॥

वृत्तिरहितजें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान ।

जेथें तुटे अनुसंधान । मायाब्रह्मींचें ॥ १४॥

मायाब्रह्म ऐसा हेत । मनें कल्पिला संकेत ।

ब्रह्म कल्पनेरहित । जाणती ज्ञानी ॥ १५॥

जें मनबुद्धिअगोचर । जें कल्पनेहून पर ।

तें अनुभवितां साचार । द्वैत कैंचें ॥ १६॥

द्वैत पाहतां ब्रह्म नसे । ब्रह्म पाहतां द्वैत नासे ।

द्वैताद्वैत भासे । कल्पनेसी ॥ १७॥

कल्पना माया निवारी । कल्पना ब्रह्म थावरी ।

संशय धरी आणि वारी । तेही कल्पना ॥ १८॥

कल्पना करी बंधन । कल्पना दे समाधान ।

ब्रह्मीं लावी अनुसंधान। तेही कल्पना ॥ १९॥

कल्पना द्वैताची माता। कल्पनाचि ज्ञप्ति तत्त्वता।

बद्धता आणि मुक्तता। कल्पनागुणें॥ २०॥

कल्पना अंतरीं सबळ। नसते दावी ब्रह्मगोळ।

क्षण एक ते निर्मळ। स्वरूप कल्पी ॥ २१॥

क्षण एक धोका वाहे। क्षण एक स्थिर राहे।

क्षण एक पाहे। विस्मित हौनी ॥ २२॥

क्षण एकांत उमजे। क्षण एक निर्बुजे।

नाना विकार करिजे। ते कल्पना जाणावी ॥ २३॥

कल्पना जन्माचें मूळ। कल्पना भक्तीचें फळ।

कल्पना तेचि केवळ। मोक्षदात्री ॥ २४॥

असो ऐशी हे कल्पना। साधनें दे समाधाना।

ये-हवीं हे पतना। मूळच कीं ॥ २५॥

म्हणोनि सर्वांचें मूळ। ते हे कल्पनाचि केवळ।

इचें केलिया निर्मूळ। ब्रह्मप्राप्ती ॥ २६॥

श्रवण आणि मनन। निजध्यासें समाधान।

मिथ्या कल्पनेचें भान। उडोनि जाय॥ २७॥

शुद्ध ब्रह्माचा निश्चय। करी कल्पनेचा जय।

निश्चितार्थें संशय। तुटोनि जाय॥ २८॥

मिथ्या कल्पनेचें कोडें। कैसें राहे साचापुढें।

जैसें सूर्याचेनि उजेडें। नासे तम॥ २९॥

तैसें ज्ञानाचेनि प्रकाशें। मिथ्या कल्पना हे नासे।

मग हें तुटे आपैसें। द्वैतानुसंधान॥ ३०॥

कल्पनेनें कल्पना उडे। जैसा मृगें मृग सांपडे।

कां शरें शर आतुडे। आकाशमार्गी॥ ३१॥

शुद्ध कल्पनेचें बळ। झालिया नासे शबल।

हेंचि वचन प्रंजळ। सावध ऐका॥ ३२॥

शुद्ध कल्पनेची खूण। स्वयें कल्पिजे निर्गुण।

स्वस्वरूपीं विस्मरण। पडोंचि नेदी॥ ३३॥

सदा स्वरूपानुसंधान। करी द्वैताचें निरसन।

अद्वैतनिश्चयाचें ज्ञान । तेंचि शुद्ध कल्पना ।। ३४।।

अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी ते अशुद्ध ।

अशुद्ध तेंचि प्रसिद्ध । शबल जाणावें ।। ३५।।

शुद्ध कल्पनेचा अर्थ । अद्वैताचा निश्चितार्थ ।

आणि शबल ते व्यर्थ । द्वैत कल्पी ।। ३६।।

अद्वैतकल्पना प्रकाशे । तेच क्षणीं द्वैत नासे ।

द्वैतासरिसी निरसे । शबलकल्पना ।। ३७।।

कल्पनेनें कल्पना सरे । ऐसें जाणावें चतुरें ।

शबल गेलियानंतरें । उरली ती शुद्ध ।। ३८।।

शुद्ध कल्पनेचें रूप । तेंचि कल्पी स्वरूप ।

स्वरूप कल्पितां तद्रूप। होय आपण ।। ३९।।

कल्पनेसी मिथ्यत्व आलें । सहजचि तद्रूप झालें ।

आत्मनिश्चयें नाशिलें । कल्पनेसी ।। ४०।।

जेचि क्षणीं निश्चय चळे । तेचि क्षणीं द्वैत उफाळे ।

जैसा अस्तमानीं प्रबळे । अंधकार ।। ४१।।

तैसें ज्ञान होतां मलिन । अज्ञान प्रबळे जाण ।

याकारणें श्रवण । अखंड असावें ॥ ४२॥

आतां असो हें बोलणें जालें । आशंका फेडूं येका बोलें ।

जयास द्वैत भासलें । तें तूं नव्हेसी सर्वथा ॥ ४३॥

मागील आशंका फिटली । इतुकेन ही कथा संपली ।

पुढें वृत्तिसावध केली । पाहिजे श्रोतीं ॥ ४४॥

हरिॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके द्वैतकल्पनानिरसननिरूपणं नाम पंचमः समासः

---

समास सहावा : बद्धमुक्तनिरूपण

श्रीराम ॥

अद्वैतब्रह्म निरूपिलें । जें कल्पनेरहित संचलें ।

क्षणएक तदाकार केलें । मज या निरूपणें ॥ १॥

परी म्यां तदाकार व्हावें । ब्रह्मचि होऊन असावें ।

पुनः संसारास न यावें । चंचळपणें सर्वथा ॥ २॥

कल्पनारहित जें सुख। तेथें नाहीं संसारदुःख।

म्हणोनि तेंचि एक। होऊन असावें॥ ३॥

ब्रह्मचि होइजे श्रवणें। पुन्हां वृत्तिवरीलागे येणें।

ऐसें सदा येणें जाणें। चुकेना कीं॥ ४॥

मनें अंतरिक्षीं जावें। क्षणएक ब्रह्मचि व्हावें।

पुन्हां तेथून कोसळावें। वृत्तिवरीमागुती॥ ५॥

प्रत्यावृत्तिसैरावैरा। किती करूं येरज़ारा।

पायीं लावूनियां दोरा। कीटक जैसा॥ ६॥

उपदेशकाळीं तदाकार। होतां पडे हें शरीर।

अथवा नेणें आपपर। ऐसें झालें पाहिजे॥ ७॥

ऐसें नसतां जें बोलणें। तेंचि वाटे लाजिरवाणें।

ब्रह्म होऊन संसार करणें। हेंही विपरीत दिसे॥ ८॥

जो स्वयें ब्रह्मचि झाला। तो मागुता कैसा आला।

ऐसें ज्ञान माझें मजला। प्रशस्त न वाटे॥ ९॥

ब्रह्मचि होऊन जावें। कां तें संसारीच असावें।

दोहींकडे भरंगळावें। किती म्हणोनि ॥ १०॥

निरूपणीं ज्ञान प्रबळे। उठोन जातां तें मावळे।

मागुता काम क्रोध खवळे। ब्रह्मरूपासी ॥ ११॥

ऐसा कैसा ब्रह्म झाला। दोहींकडे अंतरला।

वोडगस्तपणेंचि गेला। संसार त्याचा ॥ १२॥

घेतां ब्रह्मसुखाची गोडी। संसारिक मागें वोढी।

संसार करितां आवडी। ब्रह्मीं उपजे मागुती॥ १३॥

ब्रह्मसुख नेलें संसारें। संसार गेला ज्ञानद्वारें।

दोहीं अपुरीं पुरें। एकही नाहीं ॥ १४॥

याकारणें माझें चित्त। चंचळ झालें दुश्चित।

काय करणें निश्चितार्थ। एकही नाहीं ॥ १५॥

ऐसा श्रोता करी विनंती। आतां रहावें कोणे रीतीं।

म्हणे अखंड माझी मती। ब्रह्माकार नाहीं ॥ १६॥

आतां याचें प्रत्युत्तर। वक्ता देईल सुंदर।

श्रोतीं व्हावें निरुत्तर। क्षण एक आतां ॥ १७॥

ब्रह्मचि होऊन जे पडले। तेचि मुक्तिपदास गेले।

येर ते काय बुडाले। व्यासादिक ॥ १८॥

श्रोता विनंती करी पुढती। शुक मुक्तो वामदेवो वा हे श्रुती।

दोघेचि मुक्त आदिअंतीं। बोलत असे ॥ १९॥

वेदें बद्ध केले सर्व। मुक्त शुक वामदेव।

वेदवचनीं अभाव। कैसा धरावा ॥ २०॥

ऐसा श्रोता वेदाधारें। देता झाला प्रत्युत्तरें।

दोघेचि मुक्त अत्यादरें। प्रतिपाद्य केले ॥ २१॥

वक्ता बोले याउपरी। दोघेचि मुक्त सृ ष्टीवरी।

ऐसें बोलतां उरी। कोणास आहे ॥ २२॥

बहु ऋषि बहु मुनी। सिद्ध योगी आत्मज्ञानी।

झाले पुरुष समाधानी। असंख्यात ॥ २३॥

प्रऱ्हादनारदपराशरपुंडरीक-

व्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान्।

रुक्मांगदार्जुनवसिष्ठविभीषणादीन्

पुण्यानिमान्परमभागवतान्स्मरामि ॥ १॥

कविऱ्हरिरंतरिक्षः प्रबुद्धः पिप्पलायनः ।

आविऱ्होत्रो । अथ द्रुमिलश्चमसः करभाजनः ॥ २॥

यांहीवेगळे थोर थोर । ब्रह्मा विष्णु महेश्वर ।

आदिकरून दिगंबर । विदेहादिक ॥ २४॥

शुक वामदेव मुक्त झाले । येर हे अवघेच बुडाले ।

या वचनें विश्वासले । ते पढतमूर्ख ॥ २५॥

तरी वेद कैसा बोलिला । तो काय तुम्हीं मिथ्या केला ।

ऐकोन वक्ता देता झाला । प्रत्युत्तर ॥ २६॥

वेद बोलिला पूर्वपक्ष । मूर्ख तेथेंचि लावी लक्ष ।

साधु आणि व्युत्पन्न दक्ष । त्यांस हें न माने ॥ २७॥

तथापि हें जरी मानलें । तरी वेदसामर्थ्य बुडालें ।

वेदाचेनि उद्धरिलें । न वचे कोणा ॥ २८॥

वेदाअंगीं सामर्थ्य नसे । तरी या वेदासि कोण पुसे ।

म्हणोनि वेदीं सामर्थ्य असे । जन उद्धरावया ॥ २९॥

वेदाक्षर घडे ज्यासी । तो बोलिजे पुण्यराशी ।

म्हणोनि वेदीं सामर्थ्यासी । काय उणें ॥ ३०॥

वेद शास्त्र पुराण । भाग्यें झालिया श्रवण ।

तेणें होइजे पावन । हें बोलती साधु ॥ ३१॥

श्लोक अथवा श्लोकार्ध । नाहीं तरी श्लोकपाद ।

श्रवण होतां एक शब्द । नाना दोष जाती ॥ ३२॥

वेद शास्त्रीं पुराणीं । ऐशा वाक्यांच्या आयणी ।

अगाध महिमा व्यासवाणी । वदोनि गेली ॥ ३३॥

एकाक्षर होतां श्रवण । तात्काळचि होइजे पावन ।

ऐसें ग्रंथाचें महिमान । ठायीं ठायीं बोलिलें ॥ ३४॥

दोहींवेगळा तिजा नुद्धरे । तरी महिमा कैंचा उरे ।

असो हें जाणिजे चतुरें । येरां गाथागोवी ॥ ३५॥

वेद शास्त्रें पुराणें । कैशीं होती अप्रमाणें ।

दोघावांचूनि तिसरा कोणें । उद्धरावा ॥ ३६॥

म्हणसी काष्ठ होऊनि पडिला । तोचि एक मुक्त झाला ।

शुक तोही अनुवादला। नाना निरूपणें ॥ ३७॥

शुक मुक्त ऐसें वचन। वेद बोलिला हें प्रमाण।

परी तो नव्हता अचेतन। ब्रह्माकार ॥ ३८॥

अचेतन ब्रह्माकार। असता शुक योगीश्वर।

तरी सारासार विचार। बोलणें न घडे ॥ ३९॥

जो ब्रह्माकार झाला। तो काष्ठ होऊन पडिला।

शुक भागवत बोलिला। परीक्षितीपुढें॥ ४०॥

निरूपण हें सारासार। बोलिला पाहिजे विचार।

धांडोळावें चराचर। दृष्टांताकारणें ॥ ४१॥

क्षण एक ब्रह्मचि व्हावें। क्षण एक दृश्य धांडोळावें।

नाना दृष्टांतीं संपादावें। वक्तृत्वासी ॥ ४२॥

असो भागवतनिरूपण। शुक बोलिला आपण।

तया अंगीं बद्धपण। लावूं नये कीं ॥ ४३॥

म्हणोनि बोलतां चालतां। निचेष्टित पडिलें नसतां।

मुक्ति लाभे सायुज्यता। सद्गुरुबोधें॥ ४४॥

येक मुक्त एक नित्यमुक्त । एक जाणावे जीवन्मुक्त ।

येक योगी विदेहमुक्त । समाधानी || ४५||

सचेतन ते जीवन्मुक्त । अचेतन ते विदेहमुक्त ।

दोहीवेगळे नित्यमुक्त । योगेश्वर जाणावे || ४६||

स्वरूपबोधें स्तब्धता । ते जाणावी तटस्थता ।

तटस्थता आणि स्तब्धता । हा देहसंबंध || ४७||

येथें अनुभवासीच कारण । येर सर्व निष्कारण ।

तृप्तिपावावी आपण । आपुल्या स्वानुभवें || ४८||

कंठमर्याद जेविला । त्यास म्हणती भुकेला ।

तेणें शब्दें जाजावला । हें तों घडेना || ४९||

स्वरूपीं नाहीं देह । तेथें कायसा संदेह ।

बद्ध मुक्त ऐसा भाव । विदेहाचकडे || ५०||

देहबुद्धी धरून चिंतीं । मुक्त ब्रह्मादिक नव्हेती ।

तेथें शुकाची कोण गती । मुक्तपणाची || ५१||

मुक्तपण हेंचि बद्ध । मुक्त बद्ध हें अबद्ध ।

स्वस्वरूप स्वतःसिद्ध । बद्ध ना मुक्त ॥ ५२॥

मुक्तपणाची पोटीं शिळा । बांधतां जाइजे पाताळा ।

देहबुद्धीची अर्गळा । स्वरूपीं न संटे ॥ ५३॥

मीपणापासून सुटला । तोचि एक मुक्त जाहला ।

मुका अथवा बोलिला । तरी तो मुक्त ॥ ५४॥

जयास बांधावें तें वाव । तेथें कैंचा मुक्तभाव ।

पाहों जातां सकळ वाव । गुणवार्ता ॥ ५५॥

बद्धो मुक्त इति व्याख्या गुणतो न मे वस्तुतः ।

गुणस्य मायामूलत्वान्न मे मोक्षो न बंधनम् ॥ १॥

तत्त्वज्ञाता परमशुद्ध । तयासि नाहीं मुक्त बद्ध ।

मुक्त बद्ध हा विनोद । मायागुणें ॥ ५६॥

जेथें नाम रूप हें सरे । तेथें मुक्तपण कैंचें उरे ।

मुक्त बद्ध हें विसरे । विसरपणेंशीं ॥ ५७॥

बद्ध मुक्त झाला कोण । ऐसा श्रोता करी प्रश्न ।

बाधक जाणावें मीपण । धर्त्यास बाधी ॥ ५८॥

एवं हा अवघा श्रम । अहंतेचा जाण भ्रम ।

मायातीत जो विश्राम । सेविला नाहीं ॥ ५९॥

असो बद्धता आणि मुक्तता । आली कल्पनेच्या माथां ।

ते कल्पना तरी तत्त्वतां । साच आहे ॥ ६०॥

म्हणोनि हें मृगजळ। माया नाथिलें आभाळ ।

स्वप्न मिथ्या तात्काळ । जागृतीसहोय ॥ ६१॥

स्वप्नीं बद्ध मुक्त झाला । तो जागृतीसनाहीं आला ।

कैंचा कोण काय झाला । कांहीं कळेना ॥ ६२॥

म्हणोन मुक्त विश्वजन । जयांस झालें आत्मज्ञान ।

शुद्धज्ञानें मुक्तपण । समूळ वाव ॥ ६३॥

बद्ध मुक्त हा संदेह । धरी कल्पनेचा देह ।

साधु सदा निःसंदेह । देहातीत वस्तु ॥ ६४॥

आतां असो हें पुढती । पुढें रहावें कोणें रीतीं ।

तेंचि निरूपण श्रोतीं । सावध परिसावें ॥ ६५॥

हरि ॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके बद्धमुक्तनिरूपणं नाम षष्ठः समासः ॥ ६॥

----------------------------------------------------------------------

जय जय रघुवीर समर्थ ॥

समास सातवा : साधनप्रतिष्ठानिरूपण

श्रीराम ॥

वस्तूसि जरी कल्पावें । तरी ते निर्विकल्प स्वभावें ।

तेथें कल्पनेच्या नावें । शून्याकार ॥ १॥

तथापि कल्पूं जातां । न ये कल्पनेच्या हाता ।

ओळखी ठायीं न पडे चित्ता । भ्रंश पडे ॥ २॥

कांहीं दृष्टीस न दिसे । मनास तेही न भासे ।

न भासे न दिसे । कैंसें ओळखावें ॥ ३॥

पाहों जातां निराकार । मनासि पडे शून्याकार ।

कल्पूं जातां अंधकार । भरला वाटे ॥ ४॥

कल्पूं जातां वाटे काळें । परी ते काळें ना पिंवळें ।

आरक्त निळें ना ढवळें । वर्णरहित ॥ ५॥

जयास वर्णव्यक्ति नसे | भासाहूनि अनारिसें |

रूपचि नाहीं कैसें | ओळखावें || ६||

न दिसतां ओळखण | किती धरावी आपण |

हें तों श्रमासीच कारण | होत असे || ७||

जो निर्गुण गुणातीत | जो अदृश्य अव्यक्त |

जो अचिंत्य चिंतनातीत | परमपुरुष || ८||

अचिंत्याव्यक्तरूपाय निर्गुणाय गुणात्मने |

समस्तजगदाधारमूर्तये ब्रह्मणे नमः || १||

अचिंत्य तें चिंतावें | अव्यक्तास आठवावें |

निर्गुणास ओळखावें | कोणेपरी || ९||

जें दृष्टीसचि न पडे | जें मनासही नातुडे |

तया कैसें पाहणें घडे | निर्गुणासी || १०||

असंगाचा संग धरणें | निरवलंबीं वास करणें |

निःशब्दासी अनुवादणें | कोणेपरी || ११||

अचिंत्यासि चिंतूं जातां | निर्विकल्पासि कल्पितां |

अद्वैताचें ध्यान करितां। द्वैतचि उठे ॥ १२॥

आतां ध्यानचि सांडावें। अनुसंधान तें मोडावें।

तरी मागुतें पडावें। महासंशयीं ॥ १३॥

द्वैताच्या भेणें अंतरीं। वस्तु न पाहिजे तरी।

तेणें समाधाना उरी। कदा असेचिना ॥ १४॥

सवे लावितां सवे पडे। सवे पडतां वस्तु आतुडे।

नित्यानित्यविचारें घडे। समाधान ॥ १५॥

वस्तु चिंतितां द्वैत उपजे। सोडी करितां कांहींच नुमजे।

शून्यत्वें संदेहीं पडिजे। विवेकेंविण ॥ १६॥

म्हणोनि विवेक धरावा। ज्ञानें प्रपंच सारावा।

अहंभाव ओसरावा। परी तो ओसरेना ॥ १७॥

परब्रह्म तें अद्वैत। कल्पितांच उठे द्वैत।

तेथें हेतु आणि दृष्टांत। कांहींच न चले ॥ १८॥

तें आठवितां विसरिजे। कां तें विसरोन आठविजे।

जाणोनियां नेणिजे। परब्रह्म तें ॥ १९॥

त्यास न भेटतां होय भेटी । भेटों जातां पडे तुटी ।

ऐसी हे नवल गोष्टी । मुकेपणाची ॥ २०॥

तें साधूं जातां साधवेना । नातरी सोडितां सुटेना ।

लागला संबंध तुटेना । निरंतर ॥ २१॥

तें असतचि सदा असे । नातरी पाहतां दुराशे ।

न पाहतां प्रकाशे । जेथें तेथें ॥ २२॥

जेथें अपाय तेथें उपाय । आणि उपाय तोचि अपाय ।

हें अनुभवेंविण काय । उमजों जाणे ॥ २३॥

तें नुमजतांचि उमजे । उमजोन कांहींच नुमजे ।

तें वृत्तिविणपाविजे । निवृत्तिपद॥ २४॥

तें ध्यानीं धरितां नये । चिंतनीं चिंतावें तें काये ।

मनामध्यें न समाये । परब्रह्म तें ॥ २५॥

त्यास उपमे द्यावें जळ । तरी तें निर्मळ निश्चळ ।

विश्व बुडालें सकळ । परी तें कोरडेंचि असे ॥ २६॥

नव्हे प्रकाशासारिखें । अथवा नव्हे काळोखें ।

आतां तें कासयासारिखें। सांगावें हो ॥ २७॥

ऐसें ब्रह्म निरंजन। कदा नव्हे दृश्यमान।

लावावें तें अनुसंधान। कोणे परी ॥ २८॥

अनुसंधान लावूं जातां। कांहीं नाहीं वाटे आतां।

नेणे मनाचिये माथां। संदेह वाजे ॥ २९॥

लटिकेंचि काय पहावें। कोठें जाऊन रहावें।

अभाव घेतला जीवें। सत्यस्वरूपाचा ॥ ३०॥

अभावचि म्हणों सत्य। तरी वेद शास्त्रें कैसें मिथ्य।

आणि व्यासादिकांचें कृत्य। वाउगें नव्हे ॥ ३१॥

म्हणोनि मिथ्या म्हणतां नये। बहुत ज्ञानाचे उपाय।

बहुतीं निर्मिलीं तें काय। मिथ्या म्हणावें ॥ ३२॥

अद्वैतज्ञानाचा उपदेश। गुरुगीता तो महेश।

सांगतां होय पार्वतीस। महाज्ञान ॥ ३३॥

अवधूत गीता केली। गोरक्षास निरूपिली।

ते अवधूतगीता बोलिली। ज्ञानमार्ग ॥ ३४॥

विष्णु होऊन राजहंस। विधीस केला उपदेश।

ते हंसगीता जगदीश। बोलिला स्वमुखें॥ ३५॥

ब्रह्मा नारदातें उपदेशित। चतुःश्लोकी भागवत।

पुढें व्यासमुखें बहुत। विस्तारलें॥ ३६॥

वासिष्ठसार वसिष्ठ ऋषी। सांगता झाला रघुनाथासी।

कृष्ण सांगे अर्जुनासी। सप्तश्लोकी गीता॥ ३७॥

ऐसें सांगावें तें किती। बहुत ऋषि बोलिले बहुतीं।

अद्वैतज्ञान आदि अंतीं। सत्यचि असे॥ ३८॥

म्हणोन मिथ्या आत्मज्ञान। म्हणतां पाविजे पतन।

प्रज्ञेरहित ते जन। तयांस हें कळेना॥ ३९॥

जेथें शेषाची प्रज्ञा मंदली। श्रुतीस मौनमुद्रा पडिली।

जाणपणें न वचे वदली। स्वरूपस्थिती॥ ४०॥

आपणास नुमजे बरवें। म्हणोनि मिथ्या कैसें करावें।

नातरी सुदृढ धरावें। सद्गुरुमुखें॥ ४१॥

मिथ्या तेंचि सत्य झालें। सत्य असोनि मिथ्या केलें।

संदेहसागरीं बुडालें। अकस्मात मन ॥ ४२॥

मनास कल्पायाची सवे। मनें कल्पिलें तें नव्हे।

तेणें गुणें संदेह धांवे। मीपणाचेनि पंथें ॥ ४३॥

तरी तो पंथचि मोडावा। मग परमात्मा जोडावा।

समूळ संदेह तोडावा। साधूचेनि संगतीं ॥ ४४॥

मीपण शस्त्रें तुटेना। मीपण फोडितां फुटेना।

मीपण सोडितां सुटेना। कांहीं केल्या ॥ ४५॥

मीपणें वस्तु नाकळे। मीपणें भक्ति मावळे।

मीपणें शक्ति गळे। वैराग्याची ॥ ४६॥

मीपणें प्रपंच न घडे। मीपणें परमार्थ बुडे।

मीपणें सकळही उडे। यश कीर्ति प्रताप ॥ ४७॥

मीपणें मैत्री तुटे। मीपणें प्रीति आटे।

मीपणें लिगटे। अभिमान अंगीं ॥ ४८॥

मीपणें विकल्प उठे। मीपणें कलह सुटे।

मीपणें संमोह फुटे। ऐक्यतेचा ॥ ४९॥

मीपण कोणासीच न साहे । तें भगवंतीं कैसेनि साहे ।

म्हणून मीपण सांडून राहे । तोचि समाधानी ॥ ५०॥

मीपण कैसे । म् त्यागावें । ब्रह्म कैसें अनुभवावें ।

समाधान कैसें पावावें । निःसंगपणें ॥ ५१॥

आणिक एक समाधान । मीपणेंविण साधन ।

करूं जाणे तोचि धन्य । समाधानी ॥ ५२॥

मी ब्रह्मचि झालों स्वतां । साधन करील कोण आतां ।

ऐसें मनीं कल्पूं जातां । कल्पनाचि उठे ॥ ५३॥

ब्रह्मीं कल्पना न साहे । तेचि तेथें उभी राहे ।

तयेसी शोधूनि पाहे । तोचि साधु ॥ ५५॥

निर्विकल्पासि कल्पावें । परी कल्पिलें तें आपण न व्हावें ।

मीपणास त्यागावें । येणें रीतीं ॥ ५६॥

ब्रह्मविद्येच्या लपणीं । कांहींच न व्हावें असोनी ।

दक्ष आणि समाधानी । तोचि हें जाणें ॥ ५७॥

जयास आपण कल्पावें । तेंचि आपण स्वभावें ।

येथें कल्पनेच्या नांवें। शून्य आलें ॥ ५८॥

पदींहून चळों नये। करावे साधनउपाये।

तरीच सांपडे सोये। अलिप्तपणाची ॥ ५९॥

राजा राजपदीं असतां। उगीच चाले सर्व सत्ता।

साध्यचि होऊन तत्त्वतां। साधन करावें ॥ ६०॥

साधन आलें देहाच्या माथां। आपण देह नव्हे सर्वथा।

ऐसा करून अकर्ता। सहजचि आहे ॥ ६१॥

देह आपण ऐसें कल्पावें। तरीच साधन त्यागावें।

देहातीत असतां स्वभावें। देह कैंचा ॥ ६२॥

ना तें साधन ना तें देह। आपण आपला निःसंदेह।

देहींच असोन विदेह। स्थिति ऐशी ॥ ६३॥

साधनेंविण ब्रह्म होतां। लागों पाहे देहममता।

आळस प्रबळे तत्त्वतां। ब्रह्मज्ञानमिसें ॥ ६४॥

परमार्थमिसें अर्थ जागे। ध्यानमिसें निद्रा लागे।

मुक्तिमिसें दोष भोगे। अनर्गळता ॥ ६५॥

निरूपणमिसें निंदा घडे । संवादमिसें विवाद पडे ।

उपाधिमिसें येऊन जडे । अभिमान अंगीं ॥ ६६॥

तैसा ब्रह्मज्ञानमिसें । आळस अंतरीं प्रवेशे ।

म्हणे साधनाचें पिसें । काय करावें ॥ ६७॥

किं करोमि क्व गच्छामि किं गृह्णामित्यजामि किम् ।

आत्मना पूरितं सर्वं महाकल्पांबुना यथा ॥ १॥

वचन आधारीं लाविलें । जैसें शस्त्र फिरविलें ।

स्वतां हाणोनि घेतलें । जयापरी ॥ ६८॥

तैसा उपायाचा अपाय । विपरीतपणें स्वहित जाय ।

साधन सोडितां होय । मुक्तपणें बद्ध ॥ ६९॥

साधन करितांच सिद्धपण । हातींचें जाईल निघोन ।

तेणेंगुणें साधन । करूंच नावडे ॥ ७०॥

लोक म्हणती हा साधक । हेचि लज्जा वाटे एक ।

साधन करिती ब्रह्मादिक । हें ठाउकें नाहीं ॥ ७१॥

आतां असो हे अविद्या । अभ्याससारिणी विद्या ।

अभ्यासें पाविजे आद्या । पूर्ण ब्रह्म ॥ ७२॥

अभ्यास करावा कवण । ऐसा श्रोता करी प्रश्न ।

परमार्थाचें साधन । बोलिलें पाहिजे ॥ ७३॥

याचें उत्तर श्रोतयासी । दिधलें पुढियलें समासीं ।

निरूपिलें साधनासी । परमार्थाच्या ॥ ७४॥

हरि ॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके साधनप्रतिष्ठानिरूपणं नाम सप्तमः समासः ॥ ७॥

-----------------------------------------------------------------

समास आठवा : श्रवणनिरूपण

श्रीराम ॥

ऐक परमार्थाचें साधन । जेणें होय समाधान ।

तें तूं जाण गा श्रवण । निश्चयेंसीं ॥ १॥

श्रवणें आतुडे भक्ती । श्रवणें उद्भवे विरक्ती ।

श्रवणें तुटे आसक्ती । विषयांची ॥ २॥

श्रवणें घडे चित्तशुद्धी । श्रवणें होय दृढ बुद्धी ।

श्रवणें तुटे उपाधी। अभिमानाची ॥ ३॥

श्रवणें निश्चयो घडे। श्रवणें ममता मोडे।

श्रवणें अंतरीं जोडे। समाधान ॥ ४॥

श्रवणें आशंका फिटे। श्रवणें संशयो तुटे।

श्रवण होतां पालटे। पूर्वगुणआपुला ॥ ५॥

श्रवणें आवरे मन। श्रवणें घडे समाधान।

श्रवणें तुटे बंधन। देहबुद्धीचें ॥ ६॥

श्रवणें मीपण जाय। श्रवणें धोका न ये।

श्रवणें नाना अपाय। भस्म होती ॥ ७॥

श्रवणें होय कार्यसिद्धि। श्रवणें लागे समाधी।

श्रवणें घडे सर्वसिद्धी। समाधानाची ॥ ८॥

सत्संगावरी श्रवण। तेणें कळे निरूपण।

श्रवणें हो)इजे आपण। तदाकार ॥ ९॥

श्रवणें प्रबोध वाढे। श्रवणें प्रज्ञा चढे।

श्रवणें विषयांचे ओढे। तुटोनि जाती ॥ १०॥

श्रवणें विचार कळे । श्रवणें ज्ञान हें प्रबळे ।

श्रवणें वस्तु निवळे । साधकांसी ॥ ११॥

श्रवणें सद्बुद्धि लागे । श्रवणें विवेक जागे ।

श्रवणें मन हें मागे । भगवंतासी ॥ १२॥

श्रवणें कुसंग तुटे । श्रवणें काम ओहटे ।

श्रवणें धोका आटे । एकसरां ॥ १३॥

श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे ।

श्रवणें सद्वस्तु भासे । निश्चयात्मक ॥ १४॥

श्रवणें होय उत्तम गती । श्रवणें आतुडे शांती ।

श्रवणें पाविजे निवृत्ती। अचळपद ॥ १५॥

श्रवणा-ऐसें सार नाहीं । श्रवणें घडे सर्व कांहीं ।

भवनदीच्या प्रवाहीं । तरणोपाय श्रवणें ॥ १६॥

श्रवण भजनाचा आरंभ । श्रवण सर्वी सर्वारंभ ।

श्रवणें होय स्वयंभ । सर्व कांहीं ॥ १७॥

प्रवृत्ति अथवा निवृत्ति। श्रवणेंविण न घडे प्राप्ती ।

हे तों सकळांस प्रचीती । प्रत्यक्ष आहे ॥ १८॥

ऐकिल्याविण कळेना । हें ठाउकें आहे जनां ।

त्याकारणें मूळ प्रयत्ना । श्रवण आधीं ॥ १९॥

जें जन्मीं ऐकिलेंचि नाहीं । तेथें पडिजे संदेहीं ।

म्हणोनिया दुजें कांहीं । साम्यता न घडे ॥ २०॥

बहुत साधनें पाहतां । श्रवणास न घडे साम्यता ।

श्रवणेंविण तत्त्वता । कार्य न चले ॥ २१॥

न देखतां दिनकर । पडे अवघा अंधकार ।

श्रवणेंविण प्रकार । तैसा होय ॥ २२॥

कैशी नवविधा भक्ती । कैशी चतुर्विधा मुक्ती ।

कैशी आहे सहजस्थिती । हें श्रवणेंविण न कळे ॥ २३॥

न कळे षट्कर्माचरण । न कळे कैसें पुरश्चरण ।

न कळे कैसें उपासन । विधियुक्त ॥ २४॥

नाना व्रतें नाना दानें । नाना तपें नाना साधनें ।

नाना योग तीर्थाटणें । श्रवणेंविण न कळती ॥ २५॥

नाना विद्या पिंडज्ञान । नाना तत्त्वांचें शोधन ।

नाना कळा ब्रह्मज्ञान । श्रवणेंविण न कळे ॥ २६॥

अठरा भार वनस्पती । एक्या जळें प्रबळती ।

एक्या रसें उत्पत्ती । सकळ जीवांची ॥ २७॥

सकळ जीवांस एक पृथ्वी। सकळ जीवांस एक रवी ।

सकळ जीवांस वर्तवी । एक वायु ॥ २८॥

सकळ जीवांस एक पैस। जयास बोलिजे आकाश ।

सकळ जीवांचा वास । एक परब्रह्मीं ॥ २९॥

तैसें सकळ जीवांस मिळोन । सार एकचि साधन ।

तें हें जाण श्रवण । प्राणिमात्रांसीं ॥ ३०॥

नाना देश भाषा मतें । भूमंडळीं असंख्यातें ।

सर्वांस श्रवणापरतें । साधनचि नाहीं ॥३१॥

श्रवणें घडे उपरती । बद्धाचे मुमुक्षु होती ।

मुमुक्षूचेसाधक अती । नेमेंसिं चालती ॥ ३२॥

साधकांचे होति सिद्ध । अंगीं बाणतां प्रबोध।

हें तों आहे प्रसिद्ध। सकळांस ठाउकें ॥ ३३॥

ठायींचे खळ चांडाळ। तेचि होती पुण्यशीळ।

ऐसा गुण तात्काळ। श्रवणाचा ॥ ३४॥

जो दुर्बुद्धिदुरात्मा। तोचि होय पुण्यात्मा।

अगाध श्रवणाचा महिमा। बोलिला न वचे ॥ ३५॥

तीर्थव्रतांची फळश्रुती। पुढें होणार सांगती।

तैसें नव्हे हातींच्या हातीं। सप्रचीत श्रवणें ॥ ३६॥

नाना रोग नाना व्याधी। तत्काळ तोडिजे औषधी।

तैशी आहे श्रवणसिद्धी। अनुभवी जाणती ॥ ३७॥

श्रवणाचा विचार कळे। तरीच भाग्यश्री प्रबळे।

मुख्य परमात्मा आकळे। स्वानुभवासी ॥ ३८॥

या नांव जाणावें मनन। अर्थालागीं सावधान।

निदिध्यासें समाधान। होत असे ॥ ३९॥

बोलिल्याचा अर्थ कळे। तरीच समाधान निवळे।

अकस्मात अंतरीं वोळे। निःसंदेह ॥ ४०॥

संदेह जन्माचें मूळ। तें श्रवणें होय निर्मूळ।

पुढें सहजचि प्रांजळ। समाधान ॥ ४१॥

जेथें नाहीं श्रवण मनन। तेथें कैंचें समाधान।

मुक्तपणाचें बंधन। जडलें पायीं ॥ ४२॥

मुमुक्षु साधक अथवा सिद्ध। श्रवणेंविण तो बद्ध।

श्रवणमननें शुद्ध। चित्तवृत्ति होय ॥ ४३॥

जेथें नाहीं नित्य श्रवण। तें जाणावें विलक्षण।

तेथें साधकें एक क्षण। क्रमूं नये सर्वथा ॥ ४४॥

जेथें नाहीं श्रवणस्वार्थ। तेथें कैंचा हो परमार्थ।

मागें केलें तितुकें व्यर्थ। श्रवणेंविण होय ॥ ४५॥

तस्मात् श्रवण करावें। साधन मनीं धरावें।

नित्य नेमें तरावें। संसारसागरीं ॥ ४६॥

सेविलेंचि सेवावें अन्न। घेतलेंचि घ्यावें जीवन।

तैसें श्रवण मनन। केलेंचि करावें ॥ ४७॥

श्रवणाचा अनादर। आळस करी जो नर।

त्याचा होय अपहार । स्वहिताविषयीं ॥ ४८॥

आळसाचें संरक्षण । परमार्थाची बुडवण ।

याकारणें नित्य श्रवण । केलेंचि पाहिजे ॥ ४९॥

आतां श्रवण कैसें करावें । कोण्या ग्रंथास पाहावें ।

पुढिलिये समासीं आघवें । सांगिजेल ॥ ५०॥

हरि ॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके श्रवणनिरूपणं नाम अष्टमः समासः ॥ ८॥

---------------------------------------------------------------

समास नववा : श्रवणनिरूपण

श्रीराम ॥

आतां श्रवण कैसें करावें । तेंही सांगिजेल स्वभावें ।

श्रोतीं अवधान द्यावें । एकचित्तें ॥ १॥

एक वक्तृत्व श्रवणीं पडे । तेणें झालें समाधान मोडे ।

केला निश्चयो विघडे । अकस्मात ॥ २॥

तें वक्तृत्व त्यागावें । जें मायिक स्वभावें ।

तेथें निश्चयाच्या नांवें । शून्याकार॥ ३॥

एक्या ग्रंथें निश्चयो केला । तो दुजयानें उडविला ।

तेणें संशयचि वाढला । जन्मवरी ॥ ४॥

जेथें संशय तुटती । होय आशंकानिवृत्ती।

अद्वैतग्रंथ परमार्थी । श्रवण करावे ॥ ५॥

जो मोक्षाचा अधिकारी । तो परमार्थपंथ धरी ।

प्रीति लागली अंतरीं । अद्वैतग्रंथाची॥ ६॥

जेणें सांडिला इहलोक । जो परलोकींचा साधक ।

तेणें पाहावा विवेक । अद्वैतशास्त्रीं ॥ ७॥

जयास पाहिजे अद्वैत। तयापुढें ठेवितां द्वैत।

तेणें क्षोभलें उठे चित्त । तया श्रोतयांचें ॥ ८॥

आवडीसारिखें मिळे । तेणें सुखचि उचंबळे ।

नाहीं तरी कंटाळे । मानस ऐकतां ॥ ९॥

ज्याची उपासना जैसी। त्यासि प्रीति वाढे तैसी।

तेथें वर्णितां दुजयासी। प्रशस्त न वाटे ॥ १०॥

प्रीतीचें लक्षण ऐसें। अंतरीं उठे अनायासें।

पाणी पाणवाटें जैसें। आपणचि धांवे ॥ ११॥

तैसा जो आत्मज्ञानी नर। तयास नावडे इतर।

तेथें पाहिजे सारासार- । विचारणा ते ॥ १२॥

जेथें कुळदेवी भगवती। तेथें पाहिजे सप्तशती।

इतर देवांची स्तुती। कामा न ये सर्वथा ॥ १३॥

घेतां अनंताच्या व्रता। तेथें नलगे भगवद्गीता।

साधुजनांसि वार्ता। फळाशेचि नाहीं ॥ १४॥

वीरकंकण घालितां नाकीं। परी तें शोभा पावेना कीं।

जेथील तेथें आणिकीं। कामा न ये सर्वथा ॥ १५॥

नाना माहात्म्यें बोलिलीं। जेथील तेथें वंद्य झालीं।

विपरीत करून वाचिलीं। तरी तें विलक्षण ॥ १६॥

मल्हारीमाहात्म्य द्वारकेसी। द्वारकामाहात्म्य नेलें काशीसी।

काशीमाहात्म्य व्यंकटेशीं। शोभा न पावे ॥ १७॥

ऐसें सांगतां असे वाड। परी जेथील तेथेंचि गोड।

तैसी ज्ञानियांस चाड । अद्वैतग्रंथाची ॥ १८॥

योगियांपुढे राहाण । परीक्षावंतापुढें पाषाण ।

पंडितापुढें डफगाण । शोभा न पावे ॥ १९॥

वेदज्ञापुढें जती । निस्पृहापुढेंफळश्रुति ।

ज्ञानियापुढें पोथी । कोकशास्त्राच्ची ॥ २०॥

ब्रह्मचर्यापुढें नाचणी । रासक्रीडा निरूपणीं ।

राजहंसापुढें पाणी । ठेविलें जैसें ॥ २१॥

तैसें अंतर्निष्ठापुढें । ठेविलें शृंगारीटीपडें ।

तेणें त्याचें कैसें घडे । समाधान । २२॥

रायास रंकाची आशा । तक्र सांगणें पीयूषा ।

संन्याशास वोवसा । उच्छिष्टचांडाळीचा ॥ २३॥

कर्मनिष्ठा वशीकरण । पंचाक्षरीया निरूपण ।

तेथें भंगे अंतःकरण । सहजचि त्याचें ॥ २४॥

तैसे पारमार्थिक जन । तयांस नसतां आत्मज्ञान ।

ग्रंथ वाचितां समाधान । होणार नाहीं ॥ २५॥

आतां असो हें बोलणें। जयास स्वहित करणें।

तेणें सदा विवरणें। अद्वैतग्रंथीं॥ २६॥

आत्मज्ञानी एकचित्त। तेणें पाहणें अद्वैत।

एकांत स्थळीं निवांत। समाधान॥ २७॥

बहुत प्रकारें पाहतां। ग्रंथ नाहीं अद्वैतापरता।

परमार्थास तत्वतां। तारूच कीं॥ २८॥

इतर जे प्रापंचिक। हास्य विनोद नवरसिक।

हित नव्हे तें पुस्तक। परमार्थासी॥ २९॥

जेणें परमार्थ वाढे। अंगीं अनुताप चढे।

भक्तिसाधन आवडे। त्या नांव ग्रंथ॥ ३०॥

जो ऐकतांच गर्व गळे। कां ते भ्रांतीच मावळे।

नातरी एकसरी वोळे। मन भगवंतीं॥ ३१॥

जेणें होय उपरती। अवगुण अवघे पालटती।

जेणें चुके अधोगती। त्या नांव ग्रंथ॥ ३२॥

जेणें धारिष्ट चढे। जेणें परोपकार घडे।

जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ॥ ३३॥

जेणें ग्रंथ परत्र साधन । जेणें ग्रंथें होय ज्ञान ।

जेणें होइजे पावन । त्या नांव ग्रंथ ॥ ३४॥

ग्रंथ बहुत असती । नाना विधानें फळश्रुती ।

जेथें नुपजे विरक्ती भक्ति । तो ग्रंथचि नव्हे ॥ ३५॥

मोक्षेंविण फळश्रुती । ते दुराशेची पोथी ।

ऐकतां ऐकतां पुढती । दुराशाच वाढे ॥ ३६॥

श्रवणीं लोभ उपजेल जेथें । विवेक कैंचा असेल तेथें ।

बैसलीं दुराशेचीं भूतें । तयां अधोगती ॥ ३७॥

ऐकोनीच फळश्रुती । पुढें तरी पावों म्हणती ।

तयां जन्म अधोगती । सहजचि जाहली ॥ ३८॥

नाना फळें पक्षी खाती । तेणेंचि तयां होय तृप्ती।

परी त्या चकोराचे चित्तीं । अमृत वसे ॥ ३९॥

तैसें संसारी मनुष्य । पाहे संसाराची वास ।

परी जे भगवंताचे अंश । ते भगवंत इच्छिती ॥ ४०॥

ज्ञानियास पाहिजे ज्ञान । भजकास पाहिजे भजन ।

साधकास पाहिजे साधन । इच्छेसारिखें ॥ ४१॥

परमार्थ्यास पाहिजे परमार्थ । स्वार्थ्यास पाहिजे स्वार्थ ।

कृपणास पाहिजे अर्थ । मनापासूनी॥ ४२॥

योगियास पाहिजे योग । भोगियास पाहिजे भोग ।

रोगियास पाहिजे रोग- । हरती मात्रा ॥ ४३॥

कवीस पाहिजे प्रबंध । तार्किकास पाहिजे तर्कवाद ।

भाविकास संवाद । गोड वाटे ॥ ४४॥

पंडितास पाहिजे व्युत्पत्ती । विद्वानास अध्ययनप्रीती ।

कलावंतास आवडती । नाना कळा ॥ ४५॥

हरिदासांस आवडे कीर्तन । शुचिर्भूतांससंध्यास्नान ।

कर्मनिष्ठांस विधिविधान । पाहिजे तें ॥ ४६॥

प्रेमळास पाहिजे करुणा । दक्षता पाहिजे विचक्षणा ।

चातुर्य पाहे शहाणा । आदरेंसीं ॥ ४७॥

भक्त पाहे मूर्तिध्यान। संगीत पाहे तालज्ञान ।

रागज्ञानी तानमान । मूर्च्छना पाहे ॥ ४८॥

योगाभ्यासी पिंडज्ञान । तत्त्वज्ञानी तत्त्वज्ञान ।

नाडीज्ञानी मात्राज्ञान । पाहतसे ॥ ४९॥

कामिक पाहे कोकशास्त्र । चेटकी पाहे चेटकीमंत्र ।

यंत्री पाहे नाना यंत्र । आदरेंसी ॥ ५०॥

टवाळासि आवडे विनोद । उन्मतास नाना छंद ।

तामसास प्रमाद । गोड वाटे ॥ ५१॥

मूर्ख होय नादलुब्धी । निंदक पाहे उणी संधी ।

पापी पाहे पापबुद्धी । लावून अंगीं ॥ ५२॥

एकां पाहिजे रसाळ । एकां पाहिजे पाल्हाळ ।

एकां पाहिजे केवळ । साबडी भक्ती ॥ ५३॥

आगमी पाहे आगम । शूर पाहे संग्राम ।

एक पाहती नाना धर्म । इच्छेसारिखे ॥ ५४॥

मुक्त पाहे मुक्तलीला । सर्वज्ञ पाहे सर्वज्ञकळा ।

ज्योतिषी भविष्य पिंगळा । वर्णूं पाहे ॥ ५५॥

ऐसें सांगावें तें किती । आवडीसारिखें ऐकती ।

नाना पुस्तकें वाचिती । सर्वकाळ ॥ ५६॥

परी परत्रसाधनेंविण । म्हणों नये तें श्रवण ।

जेथें नाहीं आत्मज्ञान । तया नांव करमणूक॥ ५७॥

गोडीविण गोडपण । नाकेंविण सुलक्षण ।

ज्ञानेंविण निरूपण । बोलोंचि नये ॥ ५८॥

आतां असो हें बहुत । ऐकावा परमार्थ ग्रंथ ।

परमार्थग्रंथेंविण व्यर्थ । गाथागोवी ॥ ५९॥

म्हणोनि नित्यानित्यविचार । जेथें बोलिला सारासार ।

तोचि ग्रंथ पैलपार। पाववी विवेकें ॥ ६०॥

हरि ॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके श्रवणनिरूपणं नाम नवमः समासः ॥ ९॥

---------------------------------------------------------

समास दहावा : देहान्तनिरूपण

श्रीराम ॥

मिथ्या तेंचि झालें सत्य । सत्य तेंचि झालें असत्य ।

मायाविभ्रमाचें कृत्य । ऐसें असे पाहतां ॥ १॥

सत्य कळावयाकारणें । बोलिलीं नाना निरूपणें ।

तरी उठेना धरणें । असत्याचें ॥ २॥

असत्य अंतरीं बिंबलें । न सांगतां तें दृढ झालें ।

सत्य असोन हरपलें । जेथील तेथें ॥ ३॥

वेद शास्त्रें पुराणें सांगती । सत्याचा निश्चयो करिती ।

तरि न ये आत्मप्रचीती । सत्य स्वरूप ॥ ४॥

सत्य असोन आच्छादलें । मिथ्या असोन सत्य झालें ।

ऐसें विपरीत वर्तलें । देखतदेखतां ॥ ५॥

ऐसी मायेची करणी । कळों आली तत्क्षणीं ।

संतसंगें निरूपणीं । विचार घेतां ॥ ६॥

मागां झालें निरूपण । देखिलें आपणासि आपण ।

तेणें बाणली खूण । परमार्थाची ॥ ७॥

तेणें समाधान झालें । चित्त चैतन्यीं मिळालें ।

निजस्वरूपें ओळखिलें। निजवस्तूसी॥ ८॥

प्रारब्धें टाकिला देहो। बोधें फिटला संदेहो।

आतांचि पडो अथवा राहो। मिथ्या कलेवर॥ ९॥

ज्ञानियांचें जें शरीर। तें मिथ्यत्वें निर्विकार।

जेथें पडे तेचि सार। पुण्यभूमी॥ १०॥

साधुदर्शनें पावन तीर्थ। पुरती त्यांचे मनोरथ।

साधू न येतां जिणें व्यर्थ। तया पुण्यक्षेत्रांचें॥ ११॥

पुण्यनदीचें जें तीर। तेथें पडावें हें शरीर।

हा इतर जनांचा विचार। साधु तोंचि नित्यमुक्त॥ १२॥

उत्तरायण तें उत्तम। दक्षिणायन तें अधम।

हा संदेहीं वसे भ्रम। साधु तो निःसंदेही॥ १३॥

शुक्लपक्ष उत्तरायण। गृ हींदीप दिवामरण।

अंतीं रहावें स्मरण। गतीकारणें॥ १४॥

इतुकें नलगे योगियासी। तो जितचि मुक्त पुण्यराशी।

तिलांजली पापपुण्यासी। दिधली तेणें॥ १५॥

देहाचा अंत बरा झाला। देह सुखरूप गेला।

त्यास म्हणती धन्य झाला। अज्ञान जन॥ १६॥

जनांचें विपरीत मत। अंतीं भेटतो भगवंत।

ऐसें कल्पून घात। करिती आपुला स्वयें॥ १७॥

जितां सार्थक नाहीं केलें। व्यर्थ आयुष्य निघोन गेलें।

मुळीं धान्यचि नाहीं पेरिलें। तें उगवेल कैंचें॥ १८॥

जरी केलें ईश्वरभजन। तरी तो होइजे पावन।

जैसें वेव्हारितां धन। राशी माथां लाभे॥ १९॥

दिधल्याविण पाविजेना। पेरिल्याविण उगवेना।

ऐसें हें वाक्य जनां। ठाउकेंचि आहे॥ २०॥

न करितां सेवेच्या व्यापारा। स्वामीस म्हणे कोठें मुशारा।

तैसें अंतीं अभक्त नरा। स्वहित न घडे॥ २१॥

जितां नाहीं भगवद्भक्ती। मेल्या कैंची होईल मुक्ती।

असो जे जे ऐसें करिती। ते ते पावती तैसेंचि॥ २२॥

एवं न करितां भगवद्भजन। अंतीं न होइजे पावन।

जरी आलें बरवें मरण। तरी भक्तिविण अधोगती ॥ २३॥

म्हणोन साअधूनें आपुलें। जीत असतांच सार्थक केलें।

शरीर कारणीं लागलें। धन्य त्याचें ॥ २४॥

जे कां जीवन्मुक्त ज्ञानी। त्यांचें शरीर पडो रानीं।

अथवा पडो स्मशानीं। तरी ते धन्य झाले ॥ २५॥

साधूंचा देह खितपला। अथवा श्वानादिकीं भक्षिला।

हें प्रशस्त न वाटे जनांला। मंदबुद्धीस्तव ॥ २६॥

अंत बरा नव्हेचि म्हणोन। कष्टी होती इतर जन।

परी ते बापुडे अज्ञान। नेणती वर्म ॥ २७॥

जो जन्मलाचि नाहीं ठायींचा। त्यास मृत्यु येईल कैंचा।

विवेकबळें जन्ममृत्यूचा। घोट भरिला जेणें ॥ २८॥

स्वरूपानुसंधानबळें। सगळीच माया नाडळे।

तयाचा पार न कळे। ब्रह्मादिकांसी ॥ २९॥

तो जित असतांचि मेला। मरणास मारून जियाला।

जन्म मृत्युन स्मरे त्याला। विवेकबळें ॥ ३०॥

तो जनीं दिसतो परी वेगळा। वर्ततां भासे निराळा।

दृश्य पदार्थ त्या निर्मळा। स्पर्शलाचि नाहीं॥ ३१॥

असो ऐसे साधु जन। त्यांचें घडलिया भजन।

तेणें भजनें पावन। इतर जन होती॥ ३२॥

सद्गुरूचा जो अंकित साधक। तेणें केलाच करावा विवेक।

विवेक केलिया तर्क। फुटे निरूपणीं॥ ३३॥

हेंचि साधकासी निरवणें। अद्वैत प्रांजळ निरूपणें।

तुमचेंहि समाधान बाणे। साधूच ऐसें॥ ३४॥

जो संतांसी शरण गेला। तो संतचि होऊन ठेला।

इतर जनां उपयोगा आला। कृपाळुपणें॥ ३५॥

ऐसें संतांचें महिमान। संतसंगें होतें ज्ञान।

सत्संगापरतें साधन। आणिक नाहीं॥ ३६॥

गुरुभजनाचेनि आधारें। निरूपणाचेनि विचारें।

क्रियाशुद्ध निर्धारें। पाविजे पद॥ ३७॥

परमार्थाचें जन्मस्थान। तेंचि सद्गुरूचें भजन।

सद्गुरुभजनें समाधान । अकस्मात बाणे ॥ ३८॥

देह मिथ्या जाणोनि जीवें । याचें सार्थकचि करावें ।

भजनभावें तोषवावें । चित्त सद्गुरूचें॥ ३९॥

शरणागताची वाहे चिंता । तो एक सद्गुरु दाता ।

जैसें बाळका वाढवी माता । नाना यत्नेंकरूनी ॥ ४०॥

यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ॥

म्हणोनि सद्गुरूचें भजन । जयास घडे तोचि धन्य ।

सद्गुरुवीण समाधान । आणिक नाहीं ॥ ४१॥

सरली शब्दाची खटपट । आला ग्रंथाचा शेवट ।

येथें सांगितलें स्पष्ट । सद्गुरुभजन ॥ ४२॥

सद्गुरुभजनापरतें कांहीं । मोक्षदायक दुसरें नाहीं ।

जयांस न मने तिहीं । अवलोकावी गुरुगीता ॥ ४३॥

तेथें निरूपिलें बरवें । पार्वतीप्रति सदाशिवें ।

याकारणें सद्भावें । सद्गुरुचरण सेवावे ॥ ४४॥

जो ये ग्रंथींचा विवेक । विवंचून पाहे साधक ।

तयास सांपडे एक । निश्चयो ज्ञानाचा ॥ ४५॥

ज्या ग्रंथीं बोलिलें अद्वैत । तो म्हणूं नये प्राकृत ।

सत्य जाणावा वेदांत । अर्थाविषयीं ॥ ४६॥

प्राकृतें वेदांत कळे । सकळ शास्त्रीं पाहतां मिळे ।

आणि समाधान निवळे । अंतर्यामीं ॥ ४७॥

तें प्राकृत म्हणों नये । जेथें ज्ञानाचा उपाय ।

मूर्खासि हें कळे काय । मर्कटा नारिकेळ जैसें ॥ ४८॥

आतां असो हें बोलणें । अधिकारपरत्वें घेणें ।

शिंपीमधील मुक्त उणें । म्हणों नये ॥ ४९॥

जेथें नेति नेति म्हणती श्रुती । तेथें न चले भाषाव्युत्पत्ती ।

परब्रह्म आदि अंतीं । अनिर्वाच्य ॥ ५०॥

हरि ॐ तत्सत् इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे

सप्तमदशके देहातीतनिरूपणं नाम दशमः समासः ॥ १०॥

॥ दशक सातवा समाप्त ॥

---